## महत्त्वाचे

### सीनेच्या उगमस्थानी हास्य दिन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– जागतिक हास्य दिनानिमित्त जेऊर येथे सीना नदीच्या उगमस्थानी निसर्गप्रेमींसाठी रविवारी (दि. ४) ट्रेकचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी हास्य योगाबरोबरच अनेक उपक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांनी दिली. सर्वजण रोजच्या धावपळीत धकाधकीत काही क्षण स्वतःला द्यायला विसरून जातो. परंतु सर्वांसोबत काही क्षण छान वेळ घालवणे, हसणे हे आपल्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. त्यामुळे ट्रेकॅम्प संस्थेतर्फे येत्या रविवारी जागतिक हास्य दिनानिमित्त नगरकरांसाठी हास्य योगा आणि काही सरप्राईज ॲक्टिव्हिटींचे नियोजन केलेले आहे. सीना नदीचे उगमस्थान नगरपासून २० किलोमीटर अंतरावरील ससेवाडी (जेऊर, ता. नगर) रिसरातील महादेव खोरा येथे आहे. याच परिसरात ट्रेक आणि त्यासोबतच हास्य योगाचे आयोजन करण्यात आले आहे.

### कारची दुचाकीला धडक; तिघे जखमी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शहरातील पत्रकार चौक परिसरात भरधाव वेगात येणाऱ्या कारने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत पती-पत्नी आणि सात वर्षीय चिमुकली जखमी झाली. ही घटना बुधवारी (३० एप्रिल) रात्री ९.३० वाजता घडली. अमन हमीद शेख (वय ४३, रा. घासगल्ली, कोठला) हे आपली पत्नी परविन अमन शेख (वय ३८) आणि मुलगी हयान अमन शेख (वय ७) यांच्यासोबत प्रोफेसर चौक येथून दुचाकी (एमएच १६ सीएक्स १६६२) वरून घरी जात होते. पत्रकार चौकातून जिल्हा रुग्णालयाकडे वळण्यासाठी ते थांबले असता समोरून भरधाव वेगात आलेल्या कारने (एमएच १७ सीआर २२६०) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात तिघे जखमी झाले. अपघातानंतरही सदर कारचालकाने न थांबता भरधाव वेगाने पुढे जात रिक्षा (एमएच १६ सीई १२६५) ला धडक दिली. यात रिक्षातील प्रवाशी जखमी झाले. या सगळ्यानंतर संबंधित कार पलटी झाली. अपघात पाहून उपस्थित नागरिकांनी कार चालकाला पकडले व पोलिसांच्या स्वाधीन केले. जखमींना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या संपूर्ण घटनेबाबत अमन शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित कार चालकाविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुरूवारी (१ मे) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### माळीवाडा परिसरात कुटुंबावर हल्ला

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शहरातील माळीवाडा परिसरात बुधवारी (३० एप्रिल) दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास एका कुटुंबावर चार जणांनी मिळून अचानक हल्ला केला. तुळशीराम दामु त्र्यंबके (वय ४८, रा. मिरजगाव, ता. कर्जत) हे आपल्या पत्नी आणि मुलासोबत चारचाकी वाहनाने जात असताना ही घटना घडली. शकील हमीद सय्यद हा दुचाकीवरून फिर्यादीजवळ येऊन गाडी नीट चालव, मागेपुढे बघ असे म्हणत शिवीगाळ करू लागला. त्यानंतर त्याने फोनवरून आपला मुलगा अरबाज शकील सय्यद आणि दोन अनोळखी इसमांना घटनास्थळी बोलावले. चौघांनी मिळून तुळशीराम त्र्यंबके यांना मारहाण केली. या झटापटीत त्यांच्या पत्नी आणि मुलास देखील शिवीगाळ करत धक्काबुक्की झाली, शिवाय कुटुंबाला जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या गेल्या. यामध्ये तुळसीराम यांचा चष्मा फुटून नुकसान झाले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तुळशीराम यांच्या तक्रारीवरून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### केडगाव परिसरात बसच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – केडगाव गावाच्या शिवारात अहिल्यानगर- पुणे रस्त्यावर एस.टी.बसच्या धडकेत एका वृध्दाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. भाऊसाहेब नाना जाधव (वय ६९ रा. अकोलनेर, ता. अहिल्यानगर) असे मयत वृध्दाचे नाव आहे. अपघातानंतर त्यांना तात्काळ पुण्यातील हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सदर अपघात एस.टी.बसने (एमएच ०६ बीडब्लू ८६२०) भरधाव वेगात व बेफिकिरीने वाहन चालवून केला. बसचालकाने रस्त्याची परिस्थिती व समोरून येणाऱ्या वाहनांकडे दुर्लक्ष केल्याने ही धडक झाली. रस्ता ओलांडत असताना जाधव यांच्या दुचाकीला बसने जोरदार धडक दिली, ज्यामुळे त्यांना गंभीर इजा होऊन मृत्यू झाला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात बस चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण वसंत जाधव (वय ३५) यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार लगड करीत आहेत.

### निंबळकला तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – निंबळक (ता. अहिल्यानगर) गावात तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. अंकुश कबीर वाल्हेकर (वय ४०) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. ही घटना बुधवारी रात्री ८.१० वाजण्याच्या सुमारास घडली. प्राप्त माहितीनुसार, अंकुश वाल्हेकर यांनी त्यांच्या घराच्या छताला असलेल्या लाकडी दांडक्याला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. ही घटना लक्षात येताच कुटुंबियांनी तत्काळ त्यांना खासगी रुग्णवाहिकेतून औषधोपचारासाठी येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन शिंदे यांनी त्यांची तपासणी करून उपचार सुरू होण्यापूर्वीच मृत घोषित केले. अंमलदार गायकवाड यांनी दिलेल्या माहितीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची केली आहे.

# नगर शोकसागरात, बंद पाळत व्यक्त केले दुःख

## माजी आमदार जगताप यांच्या अंत्यविधीला उसळला जनसागर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – महिनाभरापासून पुण्यात खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेले माजी आ. अरूण जगताप यांचे शुक्रवारी (दि. २) रोजी पहाटे निधन झाले. त्यानंतर दुपारच्यादरम्यान त्यांचे पार्थिव नगरमधील निवासस्थानी आणण्यात आले. दरम्यान जगताप यांच्या निधनाची वार्ता कळताच नगर शहरात सर्वस्तरातून दुःख व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सायंकाळी उशीरा त्यांच्या पार्थिवावर नगरच्या अमरधाम या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय मंडळीसह नगर शहरासह जिल्हाभरातून मोठा जनसागर उपस्थित होता.

गेल्या काही दिवसांपासून पुणे येथील खासगी रुग्णालयात माजी आमदार जगताप यांच्यावर उपचार सुरु होते. उपचार सुरु असताना शुक्रवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. तब्बल एक महिना त्यांनी मृत्यूशी झुंज दिली. याबाबतची वार्ता नगरकरांना व कार्यकर्त्यांना समजताच अनेकांनी हळहळ व्यक्त केली. दिवसभर शहरातील विविध ठिकाणी राजकीय,



सामाजिक, व्यापाऱ्यांनी बंद पाळत दिवंगत जगताप यांना आदरांजली वाहण्यात आली. सकाळी १०:३० वाजता नगरच्या वंदे मातरम चौकात व्यापारी बांधवांनी तसेच मित्र परिवार व सर्व आस्थापनांचे कर्मचारी यांनी एकत्र येत व्यापारी महासंघ, वंदे मातरम युवा प्रतिष्ठान आणि कापड



बाजार श्री गणेश मित्रमंडळ यांच्यावतीने सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी जगताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहत मौन पाळण्यात आले. यावेळी बाजारपेठेत गहिवरलेले वातावरण होते. दुकानदारांनी स्वयंस्फूर्तीने व्यवहार बंद ठेवत दुःख व्यक्त केले. दरम्यान दुपारी चारच्या दरम्यान, नगरमधील त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रेला सुरूवात झाली. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सायंकाळी सहाच्या दरम्यान नगरच्या नालेगाव अमरधाम या ठिकाणी जगताप यांच्यावर अंत्यसंकार करण्यात आले.

### काका नावाने लोकप्रिय

- दिवंगत अरूण जगताप हे सर्वासाठी काका नावाने परिचित होते. काका हे नाव नगर शहराच्या राजकारणात, समाजकारणात प्रसिध्द होते. काका या नावाला त्यांनी वलय निर्माण केले. शहराच्या राजकारणापासून ते राज्याच्या राजकारणात जगताप यांना सर्वजण प्रेमाने काका म्हणून संबोधत. राजकारणात आणि समाजकारणात दिलदार काका म्हणून ते परिचित होते.

### प्रतिक्रिया

- माजी नगराध्यक्ष आणि विधान परिषदेचे माजी आमदार अरुण जगताप यांच्या अकाली जाण्याने नगरच्या राजकारण समाजकारणातील सर्वसमावेशक अजातशत्रू नेतृत्व हरपले असल्याची भावना जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष जयंत वाघ यांनी व्यक्त केली. नगरच्या विकासासाठी केलेले योगदान अमूल्य असल्याचे वाघ यांनी म्हटले आहे.
- हिवरे बाजार परिवारातील सदस्य आणि कुस्तीवर नितांत प्रेम करणाऱ्या व्यक्तिमत्वाच्या अचानक जाण्यामुळे मोठे दुःख झाले आहे. माजी आ. जगताप अनंताच्या प्रवासाला गेले असल्याची प्रतिक्रिया पद्मश्री पोपटराव पवार यांनी दिली.
- विधानपरिषदेचे माजी आमदार स्व. जगताप यांच्या अकस्मात जाण्याने जनतेच्या हितासाठी सतत झटणारं नेतृत्व आपल्यातून काळाच्या पडद्याआड गेले आहे. तत्कालीन नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी यशस्वीपणे धुरा सांभाळली. नगरच्या जडणघडणीत त्यांचे योगदान अविस्मरणीय असल्याची प्रतिक्रिया आ. रोहित पवार यांनी व्यक्त केली आहे.
- विधान परिषदेचे माजी आमदार, माजी नगराध्यक्ष व जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक या नात्याने अरुण जगताप यांनी ग्रामीण भागातून शहरात येऊन अनेक माणसे जोडली. त्यातून आ. संग्राम जगताप व सचिन जगताप यांना मोठी सामाजिक व राजकीय ताकद दिली. मितभाषी संयमी नेतृत्व असणाऱ्या अरुण जगताप यांच्या जाण्याने जगताप परिवाराची मोठी हानी झाली असल्याची प्रतिक्रिया आमदार मोनिकाताई राजळे यांनी दिली.

# अल्पवयीन मुलासह मुलीचे अपहरण

## दोन वेगवेगळ्या घटना; पालकांची पोलीस ठाण्यात धाव

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शहरातून दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये अल्पवयीन मुलासह मुलीचे अज्ञात व्यक्तींनी अपहरण केल्याच्या घटना बुधवारी (३० एप्रिल) घडल्या. संबंधितांच्या पालकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील झारेकर गल्लीत राहणाऱ्या ३४ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, त्यांचा अल्पवयीन मुलगा (वय १६) हा बुधवारी दुपारी तीन वाजता क्लाससाठी जातो असे सांगून घरातून निघून गेला. त्यानंतर तो परतलाच नाही. घरच्यांनी माळीवाडा भागात तसेच इतर ठिकाणी शोध घेतला, मात्र तो सापडला नाही. अज्ञात व्यक्तीने त्याला फूस लावून पळवून नेल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. दुसऱ्या घटनेत, केडगावात राहणाऱ्या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, त्यांची अल्पवयीन मुलगी (वय १७) ही बुधवारी रात्री ८.३० वाजता किराणा दुकानात जाते असे सांगून घरातून बाहेर पडली व त्यानंतर परतलीच नाही. घरच्यांनी परिसरात, नातेवाईक व मैत्रिणींकडे चौकशी केली, पण मुलीचा काहीही ठावठिकाणा लागला नाही.

# प्रत्येक घटकाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध

## पालकमंत्री विखे पाटील; पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर ध्वजारोहण

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये नगर जिल्हा अग्रेसर आहे. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून समाजातील प्रत्येक घटकाचा आर्थिकस्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापनानिमित्त पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पालकमंत्री विखे पाटील यांच्याहस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्याप्रसंगी जनतेला उद्देशून संदेश देताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल आदी उपस्थित होते. पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, शिर्डी विमानतळाच्या विस्तारित प्रकल्पाच्या कामाला शासनाने मंजुरी दिली आहे. नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी व शनिशिंगणापूर येथे विकासकामे करण्यात येत आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात जिल्ह्याला तीन पुरस्कार प्राप्त झाले असून शिवछत्रपती पुरस्काराने चार खेळाडूंना सन्मानित करण्यात आले आहे. या सर्व अधिकारी व खेळाडूंमुळे जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडल्याचे सांगत पुरस्कारप्राप्त अधिकारी व खेळाडूंचे पालकमंत्र्यांनी यावेळी अभिनंदनही केले.

### जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

- राज्य स्थापनेच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, उपजिल्हाधिकारी गौरी सावंत, सायली सोळंके, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, तहसीलदार शरद घोरपडे, यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी सीएम फंडाचा लाभ घ्यावा

## ना. विखे पाटील; नगरला मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे उद्घाटन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** –नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात नव्याने सुरू झालेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत केंद्राचे उद्घाटन महाराष्ट्र दिनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याहस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा शल्यचिकित्सक नागोराव चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूराव नागरगोजे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे जिल्हा कक्ष अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. निळकंठ ठाकरे आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांना लाभ देण्यासाठी या योजनेच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा व उपचारांची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे जिल्हा कक्ष अधिकारी डॉ.निळकंठ ठाकरे यांनी या कक्षा मार्फत मिळणाऱ्या सेवांची सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष अंतर्गत संलग्न रुग्णालयांची यादी व पात्रता निकषांकरिता गरजुंनी या जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कक्ष अधिकारी ठाकरे यांनी केले आहे. कार्यक्रमाला महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक रोहित करांडे, जिल्हाप्रमुख प्रियंका गोसावी, दक्षता अधिकारी विठ्ठल वांडेकर, सुपरवायझर हर्षल साळवे, राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाध्यक्ष साईनाथ भगत, वैद्यकीय अधीक्षक अजय काळे, रा. स्व. संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, विचार भारतीचे महेंद्र जाखेटे, उदय भणगे, अनिल मोहिते, रवींद्र बारस्कर, विशारद पेटकर व विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

# वयोवृध्द नागरिकासह चार जणांवर धारदार शस्त्राने हल्ला

## जॉगिंग ट्रॅकवर दुचाकी चालवण्यास मनाई केल्याचा राग

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – लक्ष्मीनगर, तपोवन रस्ता येथील सहकारी गृह निर्माण संस्थेच्या परिसरातील जॉगिंग ट्रॅकवर दुचाकी नेण्यास मनाई केल्याच्या कारणावरून दोन तरुणांनी वयोवृध्द नागरिकासह एकूण चार जणांवर हल्ला केल्याची घटना गुरूवारी (१ मे) सायंकाळी ५.३० वाजता घडली. या हल्ल्यात धारदार शस्त्राचा वापर करण्यात आला असून जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले.

याप्रकरणी सूर्यकांत नारायण झेंडे (वय ८३, रा. लक्ष्मीनगर, तपोवन रस्ता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक राजू बेळगे व अभिमन्यू राजू बेळगे (दोघे रा. डोकेनगर, तपोवन रस्ता) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी सूर्यकांत झेंडे आणि त्यांचे मित्र राजेंद्र दत्तात्रय शेटे जॉगिंग ट्रॅकवर सायंकाळी नेहमीप्रमाणे फेरफटका मारत होते. याच दरम्यान अभिषेक बेळगे आणि अभिमन्यू बेळगे हे दुचाकीवरून ट्रॅकवर येत होते. फिर्यादी आणि त्यांच्या मित्रांनी त्यांना ट्रॅकवरून वाहन चालवू नये, असे शांततेने समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र यावरून संतप्त झालेल्या दोघांनी सूर्यकांत झेंडे आणि राजेंद्र शेटे यांच्याशी उध्दटपणे बोलून त्यांना मारहाण केली. यावेळी पोलीस भरती प्रक्रियेतील एक गोळा राजेंद्र शेटे यांच्या दिशेने फेकण्यात आला. गोंधळ ऐकून निखील राजेंद्र शेटे आणि आनंद सूर्यकांत झेंडे मदतीला धावून आले, त्यांनाही मारहाण करण्यात आली. अभिमन्यू बेळगे याने धारदार शस्त्राने निखील शेटे यांच्या उजव्या गालावर आणि मानेवर, आनंद झेंडे यांच्या कानावर, मानेवर व खांद्यावर, तर राजेंद्र शेटे यांना मारहाण केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पेंटींगचे पैसे मागितल्याने तरुणाला मारहाण

## बोल्हेगावच्या हॉटेलमधील घटना; चौघांविरूध्द गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – बोल्हेगाव फाटा येथील नम्रता हॉटेल मध्ये पेंटर काम करणाऱ्या एका तरुणाला कामाचे पैसे मागितल्याच्या कारणावरून चौघांनी मारहाण केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशाल याकुब पाटोळे (वय ३२, रा. रेणुकानगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. हॉटेल नम्रताचा मालक अविनाश उर्फ नाना धोंडे, त्याचा मुलगा आदेश अविनाश धोंडे व नम्रता हॉटेल येथील दोन अनोळखी कामगार यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल पाटोळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुधवारी (३० एप्रिल) सकाळी ९.३० वाजता ते नम्रता हॉटेल येथे आपल्या पेंटींग कामाची बिले मागण्यासाठी गेले होते. त्यावेळी संशयित अविनाश उर्फ नाना धोंडे, आदेश धोंडे आणि इतर दोन अनोळखी कामगारांनी विशाल यांना शिवीगाळ करून त्यांना गचंडी धरून खाली पाडले. यावेळी एकाने जवळ असलेली विट उचलून विशाल यांच्या उजव्या कानावर जोरात मारली, यात ते जखमी झाले. एवढ्यावरच न थांबता संशयित आरोपींनी परत येथे आलास तर हातपाय तोडून टाकू, अशी धमकीही दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

घटनेनंतर जखमी विशाल पाटोळेंना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार साबीर शेख करीत आहेत.

# अहिल्यानगरमध्ये मोठ्या प्रमाणावर वीजचोरी

## महावितरणकडून कारवाई; लाखोंच्या रकमेचा दंड

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – महावितरणच्या गंजबाजार कक्ष कार्यालयाच्या पथकाने अहिल्यानगर शहरातील झेंडीगेट चौक, हमालवाडा आणि शनी गल्ली परिसरात केलेल्या वीज मीटर तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर वीजचोरी उघडकीस आली आहे. सहाय्यक अभियंता स्वप्नील संजयराव उल्हे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केलेल्या पाहणीत विविध ठिकाणी अनधिकृतपणे वीजजोडणी करून वीज वापरण्यात येत असल्याचे आढळले.

दरम्यान, यासंदर्भात स्वप्नील उल्हे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत अमन नसीम खान (रा. झेंडीगेट), सलाउद्दीन निजमोद्दीन शेख (रा. शनी गल्ली, झेंडीगेट), मोहसीन मुश्ताक कुरेशी (रा. हमालपाडा) आणि सोहेल कुरेशी (पूर्ण नाव माहिती नाही, रा. हमालपाडा) या चार नागरिकांच्या घरांमध्ये वीजचोरी करताना आढळले आहे. सदर ग्राहकांनी अधिकृत वीज कनेक्शन न घेता महावितरणच्या पोलवरून थेट फेज व न्यूट्रल वायरला आकडा टाकून सर्व्हिस वायरव्दारे वीज वापरत होते. महावितरणकडून या वीजचोरीसंदर्भात संपूर्ण व्हिडीओ शुटींग तसेच कार्यालयीन कागदपत्रे तयार करण्यात आली असून, संबंधित ग्राहकांना वीज कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत पोलिसांत फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

संबंधितांना आर्थिक दंड आकारण्यात आला आहे. यामध्ये अमन नसीम खान याला ४३ हजार ३४० रुपये, सलाउद्दीन निजमोद्दीन शेख ९९ हजार ९३० रुपये तसेच ४३ हजार ८९० थकीत बील, मोहसीन मुश्ताक कुरेशी ६६ हजार ५६० रुपये व सोहेल कुरेशी याला ६३ हजार ८३० रुपये दंड आकारण्यात आला आहे.

# बंद घर फोडले, बसमधून महिलेचे दागिने लांबविले

## दोन घटनेत रोख रक्कम व दागिने लंपास

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत. एका घटनेत बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व दागिने चोरून नेले, तर दुसऱ्या घटनेत बसमधील गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने आणि रक्कम लंपास करण्यात आली आहे.

मयुर मनसुखभाई वेकरिया (वय ३१, रा. साईकृपा आनंदबाग अपार्टमेंट, विनायकनगर, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २२ एप्रिल रोजी ते पत्नी व मुलासह मूळगाव सुरत (गुजरात) येथे गेले होते. २९ एप्रिल रोजी पहाटे ३.३० वाजता शेजारी राहणाऱ्या राजुभाई यांनी फोन करून फ्लॅटचे कुलूप व दरवाजा तुटल्याची माहिती दिली. ते तात्काळ ३० एप्रिल रोजी घरी परत आल्यावर त्यांना कपाटातील रोख रक्कम व दागिने चोरीला गेल्याचे आढळून आले. ९२ हजार रुपये रोख रक्कम, पाच ग्रॅमची सोन्याची कानातील बाळी, ४० ग्रॅमचे चांदीचे सहा कडे, २०० ग्रॅमचे चांदीचे पायातील दोन जोड असा एकूण एक लाख १९ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. सोनाली सोमनाथ निक्रड (वय ३२, रा. दरेवाडी, ता. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गुरूवारी (१ मे) दुपारी दोन वाजता त्या माळीवाडा बसस्थानकावरून मिरी (ता. पाथर्डी) येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्समधून सुमारे पाच ग्रॅमचे कानातील सोन्याचे झुबे व टॉप्स, ९०० रुपये रोख रक्कम असा एकूण १७ हजार ५८५ रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. दोन्ही घटनांची नोंद कोतवाली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.